दैनिक
# लोक आरंभ
www.lokaarambh.com
संपादक: राहुल मारोतीराव वाईकर
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
बीड | वर्ष - ०४ थे | अंक ११ | सोमवार २२ डिसेंबर २०२५ | RNI/MAHMAR/2022/84215 | पान ४ | किंमत २ रू
Beed | year - ०4 th | Issue 11 | Monday,22December 2025 | RNI/MAHMAR/2022/84215 | Page 4 | Price 2

# कोणत्या विभागात कुणाचे किती नगरसेवक आणि नगराध्यक्ष राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालाची घोषणा,

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालाची घोषणा झाली आहे. म हायुतीतील पक्षांनी यात शानदार विजय मिळवला आहे. २१५ नगराध्यक्ष हे भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या चिन्हावर निवडून आले आहेत. महायुतीचे कार्यकर्ते संपूर्ण राज्यात जल्लोष करत आहेत. आता संपूर्ण राज्यात कोणत्या पक्षाचे किती नगराध्यक्ष आणि नगरसेवक निवडून आले याची माहिती समोर आली आहे. यात



भाजप हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. कोणत्या विभागात कोणत्या पक्षाचे किती नगरसेवक निवडून आले याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

### पश्चिम महाराष्ट्रात कुणी मारली बाजी?
एकूण जागा - 60
भाजप - 19
शिवसेना - 14
राष्ट्रवादी - 14
काँग्रेस - 3
शिवसेना ठाकरे गट - 1
राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट - 3
इतर - 6

### मराठवाड्यात कोणत्या पक्षाचे किती नगराध्यक्ष?
एकूण जागा - 52
भाजप - 25
शिवसेना - 8
राष्ट्रवादी - 6
काँग्रेस - 4
शिवसेना ठाकरे गट - 4
राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट - 2
इतर - 3

### विदर्भात कोणत्या पक्षाचे किती नगराध्यक्ष निवडून आले?
एकूण जागा - 100
भाजप - 58
शिवसेना - 8
राष्ट्रवादी - 7
काँग्रेस - 23
शिवसेना ठाकरे गट - 0
राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट - 0
इतर - 4

# जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सौताडा येथे 'आनंदी बाजार' उपक्रमाचे आयोजन

पाटोदा प्रतिनिधी
जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सौताडा यांच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता व सामाजिक व्यवहारांचे ज्ञान वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने 'आनंदी बाजार' (आनंद मेळावा) या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.
या आनंदी बाजाराचे उद्घाटन सरपंच महादेव घुले व मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले. यावेळी शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष माणिक सानप, जिल्हा परिषद सदस्य माऊली जरांगे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदे पाटील, सौताडा गावचे सरपंच महादेव घुले, बाळासाहेब घुले माजी उपसरपंच भरत शिंदे पाटील, माजी सरपंच



नवनाथ सानप ग्रामपंचायत सदस्य प्रशांत गायकवाड, संदीप मस्के, शरद शिंदे, कृष्णा पोले संग्राम सानप आदी मान्यवर उपस्थित होते.या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले खाद्यपदार्थ, भाजीपाला व विविध वस्तूंचे स्टॉल लावून प्रत्यक्ष खरेदी-विक्रीचा अनुभव घेतला. विद्यार्थ्यांना देवाण-घेवाण कशी करावी, व्यवहार करताना पैशांचे नियोजन कसे करावे तसेच आर्थिक व्यवहारांचे प्राथमिक ज्ञान मिळावे, या उद्देशाने हा बाजार आयोजित करण्यात आला.
कार्यक्रमाबाबत माहिती देताना शाळेचे मुख्याध्यापक बेद्रे सर यांनी सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो, उद्योजकतेची गोडी निर्माण होते आणि सामाजिक जीवनासाठी आवश्यक असलेले आर्थिक ज्ञान प्रत्यक्ष अनुभवातून मिळते.
कार्यक्रमास शिक्षकवृंद, पालक व ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली. आनंदी वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारासाठी डॉ. हरिदास शेलार यांची निवड




आष्टी (प्रतिनिधी): शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे भगवान महाविद्यालय (कला, वाणिज्य व विज्ञान), आष्टी, ता. आष्टी, जि. बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या "गंगाई-बाबाजी कला रौप्य महोत्सव" २०२५-२०२६ अंतर्गत देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय 'गंगाई-बाबाजी आदर्श पुरस्कार' साठी उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारासाठी डॉ. हरिदास शेलार यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. हरिदास शेलार यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रश्न, शेतकरी, कष्टकरी, सामाजिक अन्याय, विकासाच्या योजना तसेच लोकहिताचे विषय सातत्याने आणि निर्भीडपणे मांडले आहेत. त्यांच्या लेखनात सामाजिक बांधिलकी, सत्यता आणि जनसामान्यांच्या प्रश्नांप्रती असलेली संवेदनशीलता स्पष्टपणे दिसून येते.
पत्रकारितेतील दीर्घकालीन कार्य, वस्तुनिष्ठ मांडणी, समाजप्रबोधन आणि लोकशाही मूल्यांची जपणूक यासाठी त्यांच्या कार्याची दखल घेऊन पुरस्कार निवड समितीने सर्वानुमते त्यांची निवड केली आहे.हा पुरस्कार लवकरच होणाऱ्या गंगाई-बाबाजी कला रौप्य महोत्सव सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. हरिदास शेलार यांच्या या निवडीबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक व पत्रकार बांधवांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बीडमध्ये इतिहासात पहिल्यांदाच भाजपचे १९ नगरसेवक विजयी

बीड (प्रतिनिधी) बीड नगरपरिषद निवडणुकीत भाजपने ऐतिहासिक यश संपादन करत शहराच्या राजकारणात आपली ताकद दाखवून दिली आहे. बीड नगरपरिषदेच्या एकूण ५२ जागांपैकी भाजपचे तब्बल १५ नगरसेवक विजयी झाले असून, बीडच्या इतिहासात प्रथमच भाजपने एवढ्या मोठ्या संख्येने नगरसेवक निवडून आणण्याची कामगिरी केली आहे. यापूर्वी भाजपचा केवळ एक नगरसेवक असायचा. यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांचा मात्र निसटता पराभव झाला. नगराध्यक्ष पदासाठी भाजपच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांनी अत्यंत चुरशीची व अटीतटीची लढत दिली. मात्र, शेवटच्या टप्प्यात अतिशय कमी मतांनी त्यांचा निसटता पराभव झाला. या निवडणुकीत डॉ.घुंबरे यांना ३२ हजार ३३ मते मिळाली असून, हा वाढता जनाधार भाजपसाठी भविष्यात निश्चितच बळ देणारा आहे, असे पक्षाच्यावतीने सांगण्यात आले. बीड नगरपरिषदेची निवडणूक मुख्यमंत्री देवेंद्र




फडणवीस, भाजप नेत्या, मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली लढविण्यात आली. ऐन निवडणुकीच्या तोंडावर डॉ.क्षीरसागर यांनी भाजपमध्ये प्रवेश करून निवडणुकीची जबाबदारी स्वीकारली होती. त्यांना खंबीर साथ देत जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्यासह सर्वच पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी निवडणुकीत परिश्रम घेतले.

## अल्पसंख्याक हक्क दिनानिमित्त बिलाल भाई कुरेशी यांना पुरस्कार प्रदान

कळंब /प्रतिनिधी तालुक्यातील शिराढोण येथील सामाजिक कार्यकर्ते व सुप्रसिद्ध पत्रकार बिलाल भाई कुरेशी यांना अल्पसंख्याक हक्क दिनाचे औचित्य साधून अल्पसंख्याक विकास महासंघ, पुणे - शिराढोण यांच्या वतीने यावर्षीचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सामाजिक क्षेत्रात तसेच पत्रकारितेच्या माध्यमातून समाजहितासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला आहे. बिलाल अब्दुल रहेमान कुरेशी हे अल्पसंख्याक समाजाच्या हक्कांसाठी सातत्याने प्रयत्नशील असून, विविध शासकीय योजनांची माहिती समाजापर्यंत पोहोचवून जनजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. या पुरस्कार वितरण समारंभास अल्पसंख्याक विकास महासंघाचे संस्थापक अध्यक्ष रफिक भाई कुरेशी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी बिलाल भाई कुरेशी यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील सामाजिक व पत्रकारितेतील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# किनवट नगरपरिषदेवर शिवसेनेचा झेंडा,सुजाता यंड्रलवार यांचा दणदणीत विजय

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
किनवट : नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 चा निकाल आज जाहीर झाला. अध्यक्षपदासाठी शिवसेना (उबाठा)च्या सुजाता विनोद यंड्रलवार यांनी 10,473 मते मिळवत दणदणीत विजय मिळवला. भाजपाच्या पुष्पा आनंद मच्छेवार यांना 6,477 मते मिळाली. एकूण वैध मतांची संख्या 19,008 असून मतमोजणी शांततेत पार पडली.
अध्यक्षपदासाठी उमेदवारनिहाय मते
सुजाता विनोद यंड्रलवार, शिवसेना (उबाठा) – 10,473 (विजयी)
पुष्पा आनंद मच्छेवार, भाजपा – 6,477
काजी राहत तबस्सुम, AIMIM – 862
शेख तयबाबेगम, भाराकाँ – 418
अब्दुल सुमय्या अंजुम, अपक्ष – 223
खान शबाना अखिल, अपक्ष – 210
शेख शाहेदा शबीर, वंबआ – 189
सर्पे सूर्यकांता मिलिंद, भाकप (मा) – 57. ,NOTA – 99
प्रभागनिहाय ठळक निकाल (विजयी उमेदवार)



प्रभाग 1 अ : संतोष किशनराव मरस्कोल्हे (भाजपा) – 904
प्रभाग 1 ब : प्रिती धीरज नेम्माणीवार (अपक्ष) – 912
प्रभाग 2 अ : अश्विनी आदर्श जागरलावार (NCP-SP) – 911
प्रभाग 2 ब : मोहम्मद हसन पठाण (NCP-SP) – 1014
प्रभाग 3 अ : निलोफर निसार भाटी (शिवसेना उबाठा) – 865
प्रभाग 3 ब : श्रीराम नारायणराव नेम्माणीवार (शिवसेना उबाठा) – 632
प्रभाग 4 अ : अभय मधुकर नगराळे (NCP) – 876
प्रभाग 4 ब : नुरसबा मुकद्दर शेख (NCP) – 873
प्रभाग 5 अ : चंद्रशेखर रंगराव नेम्माणीवार (अपक्ष) – 638
प्रभाग 5 ब : निकीता स्वागत आयनेनिवार (भाजपा) – 787
प्रभाग 6 अ : प्रविण इंद्रसिंग राठोड (NCP-SP) – 993
प्रभाग 6 ब : सरोजिनी बाबूराव ओडीवार (भाजपा) – 684
प्रभाग 7 अ : ललिताबाई मारोती मुनेश्वर (अपक्ष) – 884
प्रभाग 7 ब : श्रीनिवास किशनराव नेम्माणीवार (भाजपा) – 1006
प्रभाग 8 अ : गंगाबाई नारायणराव कोल्हे (शिवसेना उबाठा) – 867
प्रभाग 8 ब : सुरज किशनराव सातुरवार (शिवसेना) – 1248
प्रभाग 9 अ : सादिका इम्रान शेख (NCP) – 741
प्रभाग 9 ब : नईमाबेगम मिर्झा सईद (NCP-SP) – 508
प्रभाग 10 अ : अभय भिमराव महाजन (NCP-SP) – 970
प्रभाग 10 ब : गुलबखत अकबर खान (NCP) – 986
प्रभाग 10 क : जरीना खानम साजिद खान (NCP) – 1118

कडेकोट पोलीस बंदोबस्त; कोणताही अनुचित प्रकार नाही
निकाल जाहीर होण्यापूर्वीपासून नगरपालिकेसमोर व शहरातील प्रमुख चौकांत कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक गणेश कऱ्हाड यांच्या नेतृत्वाखाली, पोलीस उपविभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला. प्रत्येक चौकात तसेच मुख्य ठिकाणी प्रभावी बंदोबस्त असल्याने मतमोजणी व निकाल प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहिली.
राजकीय समीकरणे
या निकालातून शिवसेना (उबाठा) व NCP/NCP-SP यांची भक्कम उपस्थिती स्पष्ट झाली असून, काही प्रभागांत अपक्ष उमेदवारांनीही प्रभावी कामगिरी करत मतदारांचा विश्वास संपादन केला आहे. अध्यक्षपदावर सुजाता यंड्रलवार यांच्या विजयामुळे नगरपरिषदेतील पुढील कारभाराबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

दैनिक लोकआरंभ
सोमवार २२ डिसेंबर २०२५
www.lokaarambh.com



संपादकीय

# संक्रांत कोणावर?

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाने अपेक्षेप्रमाणे सोमवारी जाहीर केल्याने राज्यात ममहापालिकांचा महासंग्रामम सुरू झाला आहे. त्यात आता मकर संक्रांतीपर्यंत खंड पडणार नाही. या वर्षाची संक्रांत कोणावर आणि तीळगूळ कोणाला, ते संक्रांतीनंतर दोन दिवसांनी ईव्हीएम मशीनमधूनच उघड होईल. महाराष्ट्राच्या विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन नॉनस्टॉप सात दिवस चालवण्याचं सरकारने कामकाज सल्लागार समितीत संमत करून घेतलं, तेव्हाच १४ डिसेंबरनंतर कोणत्याही क्षणी महापालिकांच्या निवडणुका जाहीर होणार, हे स्पष्ट झालं होतं .अन्यथा, नागपूरच्या मनमौजी थंडीत कोण कशाला रविवारीही कामकाज ठेवेल? सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २६ जानेवारीपूर्वी आटोपण्याचे आदेश दिले आहेत. नगर परिषदा आणि नगरपंचायतींचं मतदान झालं असलं, तरी अद्याप मतमोजणी आणि निकाल जाहीर होणं शिल्लक आहे. त्याबाबतही न्यायालयाने आदेश दिले आहेत. पण, त्या आदेशांबाबतच प्रशासकीय यंत्रणेच्या मनात गोंधळ आहे. त्या गोंधळाचं निराकरण झालं, की ते निकाल लागतीलच. पण, तोपर्यंत सगळ्यांचं लक्ष महानगरपालिकांच्या निवडणुकांकडे लागलं असेल. सर्वच राजकीय पक्षांसाठी शक्तिप्रदर्शनाची ही उत्तम संधी आहे. विद्युतवेगाने नागरिकरण सुरू असलेल्या महाराष्ट्रातल्या महानगरी मतदाराच्या मनात आपलं स्थान नेमकं काय आहे, हे साऱ्या देशाला दाखवून देण्याची संधी महाराष्ट्रातल्या विविध पक्षांच्या नेत्यांना यानिमित्ताने मिळाली आहे. त्यासाठी त्यांनी व्यूहरचना कधीचीच करून ठेवली आहे. आता साधनसामग्रीसह मैदानात उतरणं तेवढं बाकी आहे. नगर परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत जो राजकीय गोंधळ दिसला, तसाच गोंधळ या निवडणुकांतही बघायला मिळणार आहे. महाविकास आघाडी राज्यातून संपल्यात जमा आहे. आघाडीला धरून ठेवणारी शरद पवार नावाची शक्तीच आघाडीतून बाहेर पडली आहे. त्यांनी महाविकास आघाडीतील आपल्या तुटल्या तुकड्यासोबत निवडणुकीत युती करण्याचं नक्की केलं आहे. भारतीय जनता पक्षाचे सर्वोच्च चाणक्य अमित शहा यांनीही या जुळवाजुळवीला कालच दिल्लीत संमती दिली आहे. शरद पवार आणि अजित पवार या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन तुकड्यांत अजित पवार यांचा तुकडा सध्या चांगलाच ताकदवान आहे. अजितदादा स्वतः उपमुख्यमंत्री आहेत. त्यांना दिल्लीत अजून मंत्रीपद मिळालं नसलं, तरी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना तेल आणि नैसर्गिक वायूशी संबंधित तालेवार समितीचं अध्यक्षपद मिळालं आहे. पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांचा दिल्लीच्या वर्तुळातला वावर सहजपणे होतो आहे. त्यामुळे या दोन पक्षांत जुळवून घेण्याची गरज सर्वाधिक शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाला वाटायला हवी. पण, दिसतं आहे ते वेगळंच. दुसऱ्या गटाबरोबर जुळवून घेण्याबाबत अजित पवार गटच जास्त उत्सुक दिसतो आहे. कारण, दोन तुकड्यांत हा गट ताकदवान असला, तरी महायुतीत प्रतिष्ठेने राहायचं, तर या निवडणुकीत जे बळ दाखवावं लागणार आहे, ते शरद पवार यांच्या तुकड्याच्या सहकार्याशिवाय शक्य नाही, हे त्यांना समजून चुकलं आहे. तटकरे आणि पटेल यांनी म्हणूनच शहा यांची भेट घेऊन त्यांच्याकडून या सहकार्याला संमती मिळवली. शरद पवार गटाचे कार्यकर्ते राज्यात सध्या निर्नायकी अवस्थेत आहेत. खुद्द पवार यांना वय आणि आजारपण यामुळे अन्य नेत्यांच्या तडफेने राजकारण करणं केवळ अशक्य आहे. त्यांच्याशिवाय त्या पक्षात पक्षावर प्रभाव पाडेल, पक्षसंघटनेला एकत्र बांधून ठेऊ शकेल, असा दुसरा नेता नाही. हे खुद्द शरद पवार यांना सर्वात आधी लक्षात आलं असेल. त्यामुळे, पक्ष अगदीच मशून्याफ्त जाण्यापेक्षा आपल्याच पुतण्याशी समझोता करून (स्वतःला वेगळं ठेऊन) पक्ष महायुतीच्या वाहत्या प्रवाहात सोडून देण्याचा निर्णय त्यांनी घेतलेला दिसतो. शरद पवार आणि शहा यांच्यातल्या एकेरी सामन्यात हा अंतिमतः शहा यांचाच विजय असल्याने तटकरे आणि पटेल यांना परवानगी मिळवणं अगदीच सोपं गेलं असणार. शेवटी, मकरून दाखवलंचफ म्हणून त्यांनी शहा यांची शाबासकीही मिळवली असेल! पण, तरीही यात एक अडचण आहेच. नवाब मलिक. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कोणत्याही परिस्थितीत नवाब मलिक यांचा चेहरा महायुतीत दिसायला नको आहे. भाजपला मुस्लीमबहुल मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसला लढवायचं आहे.

# मानसिकतेतील बदलच मिटवणार

## लिंगभेदाची दरी डॉ. दादासाहेब मोटे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी /प्रदीप पोटफोडे

पाचोड : समाजातील प्रस्थापित लिंगभेद पूर्णपणे नष्ट करून खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करणे, ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. जोपर्यंत महिलांना समाजात सन्मानाने आणि सुरक्षिततेने वावरता येत नाही, तोपर्यंत आपली सामाजिक प्रगती अपूर्णच राहील. ही दरी मिटवण्यासाठी केवळ कायदे नव्हे, तर समाजाच्या मानसिकतेत बदल होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. दादासाहेब मोटे यांनी केले. शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग आणि मपीएएमफउषा अंतर्गत आयोजित मजेंडर आणि सोसायटीफ या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे होते. डॉ. मोटे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनात लिंगभेदाचे समाजावर होणारे दुरगामी दुष्परिणाम सविस्तरपणे मांडले. ते म्हणाले की, मुला-मुलींमधील भेदभाव हा कौटुंबिक स्तरापासूनच सुरू होतो, तो थांबायला हवा. शिक्षणाचे आणि रोजगाराचे महत्त्व ओळखून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे ही काळाची पावले आहेत. घरातील कामात पुरुषांचा सहभाग वाढवून स्त्रियांवर लादलेली पारंपरिक सामाजिक बंधने आता शिथिल व्हायला हवीत.जाणीवजागृतीतून समता शक्य



होईल.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे म्हणाले की, ङ्गसमाजाने एकत्रितपणे प्रयत्न केल्यास लिंगभेदाचे भिंती नक्कीच ढासळतील. अशा प्रकारच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांमुळे तरुण पिढीमध्ये सामाजिक जाणीव आणि संवेदनशीलता निर्माण होण्यास मोठी मदत होईल.ङ्गया कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गांधी बानायत यांनी केले . त्यांनी सर्टिफिकेट कोर्सच्याअभ्यासक्रमाचा उद्देश आणि त्याचे शैक्षणिक स्वरूप स्पष्ट केले.तर प्रा . संदीप सातोणकर यांनी प्रभावीपणे सूत्रसंचालन केले. मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. विलास महाजन यांनी उपस्थितांचे आभार मानले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे पीएम उषा समन्वयक. प्रा. संदीप सातोणकर, डॉ. सुभाष पोटभरे, डॉ. संतोष चव्हाण डॉ.उत्तम जाधव डॉ.भगवान जायभाये प्रा. सचिन कदम प्रा.विनोद कांबळे डॉ. विठ्ठल देखणे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# अनुवादासाठी सामाजिक-सांस्कृतिक

## पार्श्वभूमीचे भान आवश्यक' डॉ. एकनाथ शिंदे

प्रतिनिधी/प्रदीप पोटफोडे

पाचोड-- शिवछत्रपती कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पीएम उषा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने 'भाषांतर आणि अनुवाद ' प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा शुभारंभ करण्यात आला याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पैठण येथील ताराई महाविद्यालयातील डॉ.एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती तर अध्यक्षीयस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रसेन कोठावळे यांनी भूषविले डॉ.शिंदे यांनी आपल्या मार्गदर्शनात अनुवाद ही केवळ एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत नेण्याची प्रक्रिया नसून ती एक सूक्ष्म कला आहे. कोणत्याही साहित्यकृतीचा अनुवाद करताना त्यातील सामाजिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक पार्श्वभूमीचा सखोल अभ्यास असणे अनिवार्य आहे. त्याशिवाय मूळ साहित्याचा आत्मा दुसऱ्या भाषेत जिवंत




ठेवता येत नाही,कौशल्याधिष्ठित शिक्षणावर भर अनुवादाच्या तांत्रिक आणि सृजनात्मक पैलूंवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "मूळ लेखकाचा आशय आणि त्या प्रदेशाची वैशिष्ट्ये समजून घेतल्याशिवाय दर्जेदार अनुवाद शक्य नाही. विद्यार्थ्यांनी केवळ शब्दांकडे न पाहता त्यामागील संस्कृती समजून घेण्याचा प्रयत्न करावा."रोजगाराच्या नव्या संधी शोधल्या पाहिजे अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी या अभ्यासक्रमाचे आजच्या जागतिकीकरणाच्या युगात भाषांतर आणि अनुवादाच्या क्षेत्रात रोजगाराच्या प्रचंड संधी उपलब्ध आहेत. केवळ साहित्यच नव्हे, तर माध्यम क्षेत्र, चित्रपट आणि कॉर्पोरेट जगतातही कुशल अनुवादकांची मोठी गरज आहे. विद्यार्थ्यांनी या संधींचे सोने करावे," असे आवाहन त्यांनी केले. प्रस्ताविकामध्ये डॉ. संतोष चव्हाण यांनी या सर्टिफिकेट कोर्स चे महत्व व उद्देश याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद कांबळे यांनी केले तर आभार डॉ.भगवान जायभाय यांनी मानले

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव डॉ. सुभाष पोटभरे डॉ.उत्तम जाधव डॉ.गांधी बानायत डॉ.तुकाराम गावंडे सतीश वाघ प्रा. सचिन कदम प्रा. संदीप सातोणकर डॉ.हेमंत कुमार जैन मराठी विभागाचे सदस्य आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# कुमारी कस्तुरी प्रशांत मस्के कृती

## गौरव राज्यस्तरीय पुरस्कारने सन्मानित

प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे

दि.२१ डिसेंबर २०२५ ला नुकतेच कुमारी कस्तुरी प्रशांत मस्के वय वर्ष ५ यांना कृती गौरव राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले बी एस एफ बहुउद्देशीय संस्था अमरावती उपेक्षित नायक व संत कबीर बहुउद्देशीय संस्था बुलढाणा संकल्प बहुउद्देशीय संस्था अकोला यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित कृती गौरव राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२५ महाराष्ट्रातील पावन भुमी शेगाव या ठिकाणी उत्साहात पार पडले कार्यक्रमाचे अध्यक्ष अंबादास अमोल जाधव आपुलकी सोशल वेल्फेअर फाउंडेशन नाशिक प्रमुख उपस्थिती डॉक्टर रावसाहेब घोडेस्वार समाजसेवक



वृक्ष मित्र प्रमुख उपस्थिती वैशाली माधवराव सोनवणे समाजसेविका नाशिक अल्ताफ दादासाहेब शेख लेखक थेटर दिग्दर्शक नॅशनल इंटरनॅशनल पुरस्कार विजेते डॉक्टर गणेश व्यवहारे अभिनेता वाशिम इंजिनीयर डी एन इंगळे दिग्दर्शक निर्माता बुलढाणा विशेष उपस्थिती एड. शितल तायडे उपेक्षित नायक न्यूज कार्यकारी संपादक राजेंद्र येलवडे संत कबीर बहुउद्देशीय संस्था बुलढाणा संस्थापक अध्यक्ष ऋतुजा लोटाडे प्रसिद्ध मॉडेल शिल्पा राजेंद्र पवार वरिष्ठ कोषागार अधिकारी क्लास वन अमरावती अश्विनी बाळकृष्ण सांगळे प्रसिद्ध निवेदिका व साहित्य सतीश नारायण शिंदे प्रसिद्ध साहित्य विष्णू खेमाजी गायकवाड दैनिक लोकमत पत्रकार बीड डॉक्टर शशिकांत सुमंतराव मुळे बीड आदी मान्यवर उपस्थित होते विशेष अतिथी श्री सतीश नारायण शिंदे प्रसिद्ध साहित्य यांच्या हस्ते कुमारी कस्तुरी प्रशांत मस्के यांना कृती गौरव पुरस्कार २०२५ राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले यात शाल श्रीफळ सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले त्यावेळी त्यांची आई श्रीमती रोहिणी प्रशांत मस्के व वडील श्री प्रशांत मस्के आदी उपस्थित होते कस्तुरी ही वय वर्ष पाच वर्षाची असून या अगोदर तिला विविध संस्थांच्या तर्फे अनेक पुरस्कार दिले आहेत कस्तुरीला तिच्या बुद्धिमत्तेच्या आधारावर हे पुरस्कार मिळाले आहेत कस्तुरी ही थोर पुरुष महापुरुष क्रांतीकारक यांच्या जीवनावर आधारित संपूर्ण परिचय अवघ्या दोन ते तीन मिनिटात सादर करते तिच्या कौशल्य बुद्धी करता हे पुरस्कार तिला प्रधान झाले आहेत कस्तुरी ची बुद्धी जणू संगणक प्रमाणेच काम करते तिच्या या कामगिरी करिता आई–बाबा नातेवाईक यांनी कस्तुरीला खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत

# आलापुर येथे मंदिराबाई फपाळ यांच्या

## निधनाने शोककळा; मान्यवरांच्या सांत्वन भेटी





दि 22/12/2025 सोमवार रोजी मंदिराबाई दामोधर फपाळ यांचा दशक्रिया विधी ( दहाव्याचा ) कार्यक्रम मंजरथ ता माजलगाव जी बीड येथे होणार आहे तरी पाहुणेमंडळी व मित्रमंडळी यांनी नोंद घ्यावी माजलगाव तालुक्यातील आलापुर (बेलोरा) येथील ज्येष्ठ पत्रकार व विकासनामा साप्ताहिकाचे संपादक बालासाहेब दामोधर फपाळ यांच्या मातोश्री कै. मंदिराबाई दामोधर फपाळ यांचे दिनांक १८ डिसेंबर २०२५, गुरुवार रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने फपाळ कुटुंबावर तसेच संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली आहे. कै. मंदिराबाई फपाळ या स्वभावाने प्रेमळ, कर्तव्यनिष्ठ व संस्कारक्षम होत्या. कुटुंबसंस्कार जपणाऱ्या या मातृशक्तीच्या जाण्याने कुटुंबीयांवर मोठा आघात झाला आहे. त्यांच्या पश्चात पुत्र,मुलगी सून, नातवंडे असा परिवार आहे. या दुःखद घटनेनंतर आलापुर येथे पाण्याच्या टाकीजवळ (ता. माजलगाव, जि. बीड) सांत्वन भेटींसाठी मोठ्या प्रमाणावर मान्यवर येत आहेत. यावेळी विविध क्षेत्रांतील संपादक, पत्रकार, राजकीय पदाधिकारी, शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिनिधी, व्यावसायिक, शेतकरी बांधव, महाराज मंडळी तसेच सर्व स्तरांतील नागरिकांनी फपाळ कुटुंबाची भेट घेऊन आपली श्रद्धांजली अर्पण केली व कुटुंबीयांचे सांत्वन केले. सांत्वन भेटीच्या प्रसंगी उपस्थितांनी कै. मंदिराबाई फपाळ यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या जीवनकार्याबद्दल आदर व्यक्त केला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी फपाळ कुटुंबाला या दुःखातून सावरण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थनाही व्यक्त केली. कै. मंदिराबाई फपाळ यांचे निधन ही आलापुर बेलोरा परिसरासाठी मोठी हानी असून, त्यांच्या स्मृती कायम प्रेरणादायी राहतील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# काँग्रेसचा नारा कितपत खरा?

पक्षाच्या विचारधारेवर आणि नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेऊन पक्षासाठी समर्पितपणे काम करणारा मोठा वर्ग आजही काँग्रेसमध्ये आहे. त्याला काँग्रेसमधील ङ्गनिष्ठावंतफ असे म्हणतात. महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यातील अशा निष्ठावंत घराण्यांना म्हणूनच राजकीय वर्तुळात किंमत होती. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याचा उल्लेख झाला, की काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री, माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचे घराणे डोळ्यांसमोर येते. एकेकाळचा काँग्रेसचा नांदेडचा गड आता भाजपचे सत्ताकेंद्र म्हणून ओळखला जात आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण आणि त्यांची मुलगी श्रीजया चव्हाण यांनी नांदेडच्या गडावर कमळ फुलविले आहे. खासदारकी आणि आमदारकी पिता पुत्रीकडे असल्याने काँग्रेसच्या महाताफ्ला आधार देण्यासाठी नवे नेतृत्व शोधण्याची वेळ काँग्रेसवर आली. माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्नुषा अर्चना पाटील यांनी एक वर्षापूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला; मराठवाड्यातीलच हिंगोली जिल्ह्यातील काँग्रेसचे एकनिष्ठ घराणे म्हणून सातव घराणे परिचित होते. विधान परिषदेच्या काँग्रेसच्या आमदार प्रज्ञा सातव यांनी आमदारकीचा राजीनामा देऊन थेट भाजपमध्ये प्रवेश केला. सातव यांनी दिलेल्या राजीनाम्यानंतर काँग्रेस पक्षामध्ये किती अस्वस्थता पसरली, हे लपून राहिले नाही. मनिष्ठावंतफप्रज्ञा सातव यांनी भाजप प्रवेशानंतर दिलेली प्रतिक्रियाही बोलकी आहे. मपंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जो विकासाचा रथ सुरू आहे त्यामुळे विकासासाठी भाजपशिवाय पर्याय नाही, मअसे त्यांनी म्हटल्याने काँग्रे्सच्या निष्ठावंत घराण्यातील व्यक्तींनाही यापुढे देशात भाजपशिवाय भवितव्य नाही, असे वाटू लागले हे निश्चितच. त्यातून सर्वसामान्य तळागाळातील काँग्रेस कार्यकर्ता नक्कीच बिथरला असणार, हे अर्थातच नव्याने सांगायला नको. देशपातळीवर देशातील सर्वात जुना पक्ष असलेल्या काँग्रेसला स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीनंतर विरोधी पक्ष टिकविण्यात यश आले असले, तरी पुढील १० वर्षांत काँग्रेस सत्तेवर येईल का, याची चिंता काँग्रेसच्या दिल्लीपासून गल्लीपर्यंत सर्वच नेत्यांना सतत सतावत असते. २०१४ आणि २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला साधा विरोधी पक्ष नेतेपदावर दावा करता येईल, एवढे संख्याबळ मिळवता आले नाही. तेव्हापासूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेमुळे मकाँग्रेसमुक्त भारतफ होण्याची प्रकिया सुरू झालेली दिसते. त्यात वैचारिक भूमिकेत संभ्रम असल्याने बहुसंख्य हिंदू मतदार काँग्रेसपासून दुरावला. अयोध्येतील रामजन्मभूमी मंदिराच्या सोहळ्यापासून काँग्रेसने स्वत:ला वेगळे करण्याचा प्रयत्न केल्याचा फटका काँग्रेसला बसला. या सोहळ्याला हजेरी लावली, तर मुस्लीम वर्ग नाराज होईल, अशी गणिते काँग्रेसचे धुरंधर मांडत राहिले. रामजन्मभूमीचा कडवा विरोध करूनच आपण सत्तेवर येऊ शकतो, असे काँग्रेसच्या धुरिणांना वाटले. म्हणून त्यांनी न्यायालयाचे खटले कसे दीर्घकाळ चालतील, ते बघितले. न्यायालयामध्ये रामाच्या अस्तित्वावरच शंका उपस्थित केल्या. मंदिर बाबराने पाडले, याला ऐतिहासिक पुरावा नाही, असा युक्तिवाद केला. सर्वोच्च न्यायालयात दहा-बारा वकिलांची फौज उभी केली आणि सोनिया गांधी जेव्हा काँग्रेसच्या सर्वेसर्वा झाल्या, त्यावेळी त्यांनी मबाबरी ढाचाफ पडल्याबद्दल मुसलमान समाजाची माफीसुद्धा मागितली; परंतु १९९२ नंतर एवढी सगळी मुस्लीमधार्जिणी भूमिका घेऊनही काँग्रेसला लोकसभेत निर्विवाद बहुमत मिळविता आले नाही, हे वास्तव आहे. काँग्रेसची हक्काची मुस्लीम मते वेगवेगळ्या प्रादेशिक पक्षांत विभागली गेली. दिल्लीत केजरीवाल, उत्तर प्रदेशात मायावती आणि अखिलेश यादव, बिहारमध्ये नितीश कुमार, बंगालमध्ये ममता बॅनर्जी आदी मुस्लीम मतांचे ठेकेदार बनले. तरीही काँग्रे्स पक्षाला मुस्लीम मते आपल्यापासून दूर जाऊ नये असे वाटते. दलित, मुस्लीम मतांच्या राजकारणामुळे राज्यातील महाविकास आघाडीतील

काँग्रे्स पक्षाने मुं्बईसह प्रमुख महापालिका निवडणुकीत स्वबळाचा नारा दिला आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत स्वतंत्र लढण्याचा निर्धार काँग्रेसच्या मुंबई अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केला आहे.

# बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिकेच्या निवडणुकांची मतमोजणी आज सकाळी १० वाजता सुरु होणार

लोकशाही प्रक्रियेचा सन्मान राखून मतमोजणी प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे - जिल्हाधिकारी

बीड /प्रतिनिधी मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकांसाठी दिनांक ०४.११.२०२५ रोजी थेट अध्यक्ष व सदस्य पदासाठी घोषीत केलेल्या प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रमानुसार बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, परळी वैजनाथ, अंबाजोगाई व किल्ले-धारुर या नगरपरिषदांमध्ये दिनांक ०२/१२/२०२५ रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० पर्यंत मतदान पार पडले आहे. तसेच अपिल दाखल झालेल्या प्रभागातील सदस्य पदासाठी बीड, परळी वैजनाथ, अंबाजोगाई व किल्ले-धारुर या नगरपरिषदांमध्ये दिनांक २०/१२/२०२५ रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० पर्यंत मतदान पार पडले असून दिनांक २१/१२/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजले पासून मतमोजणी पार पडणार आहे. मा. श्री. विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी बीड




यांनी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतमोजणीच्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, व पोलीस अधिकारी यांचे सोबत तउ द्वारे बैठक घेऊन आवश्यक त्या सूचना दिल्या तसेच मतमोजणीसाठी प्रशासनाची पूर्ण तयारी झालेली आहे. मतमोजणी केंद्रावर अधिस्विकृतीधारक पत्रकार व प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी यांचे करिता स्वंतंत्र मिडीया सेल स्थापन केला असुन फेरी निहाय मतमोजणी बाबतची आकडेवारी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे मार्फत उपलब्ध करून दिली जाणार आहे. मतमोजणी केंद्रामध्ये केवळ उमेदवार, उमेदवाराचा अधिकृत मतमोजणी प्रतिनिधी, यांना मतमोजणी कक्षात प्रवेश राहील. मतमोजणी प्रतिनिधी अथवा कोणत्याही अन्य व्यक्तीस मतमोजणी कक्षात कोणत्याही परिस्थितीत मोबाईल व तत्सम इलेक्ट्रॉनिक उपकरण बाळगता येणार नाही. मतमोजणीची प्रक्रिया शांततामय, पारदर्शक व कायदेशीर वातावरणात पार पडण्यासाठी नागरिकांनी मतमोजणी केंद्र परिसरात गर्दी, घोषणाबाजी, मिरवणूक किंवा शक्तीप्रदर्शन टाळावे, अफवा, भडक वक्तव्ये किंवा सोशल मीडियावर चुकीची माहिती प्रसारित करू नये, प्रशासन व पोलीस यंत्रणेला कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करावे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती, उमेदवार अथवा राजकीय पक्षाविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. त्यामुळे सर्व संबंधितांनी संयम, शिस्त व जबाबदारीने वागावे, तसेच लोकशाही प्रक्रियेचा सन्मान राखून मतमोजणी प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन मा. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडून करण्यात येत आह

# सचिन बेंडभर यांचा हत्तीची सहल हा काव्यसंग्रह बाल वाचकांच्या भेटीला

ता. 20 पुणे प्रतिनिधी

संस्कृती प्रकाशनाच्या प्रकाशिका सुनिताराजे पवार यांच्याकडून महाराष्ट्रातील प्रसिद्ध बालसाहित्यिक सचिन बेंडभर यांचा नवाकोरा बालकाव्यसंग्रह हत्तीची सहल हा बालवाचकांच्या भेटीला येत आहे. संपूर्ण फोर कलर मध्ये असलेल्या या पुस्तकाचे मुखपृष्ठ व आतील चित्रे प्रसिद्ध चित्रकार प्रतीक काटे यांनी साकारले आहेत. प्रसिद्ध लेखिका संगीता बर्वे यांनी या पुस्तकाला अभ्यासपूर्ण प्रस्तावना दिली आहे. तर साहित्य अकादमी बालसहित्य पुरस्कार प्राप्त साहित्यिक एकनाथ आव्हाड




यांनी या पुस्तकाची पाठराखण केली आहे.

सचिन बेंडभर यांच्या याआधी दिलीपराज प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या मामाच्या मळ्यात या बालकाव्यसंग्रहाला आजपर्यंत महाराष्ट्रातील नामवंत साहित्य संस्थांचे सात राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त आहेत. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एम. ए. च्या अभ्यासक्रमात या पुस्तकाचा समावेश आहे.

तर वाघोबाचा मोबाईल हा बालकाव्यसंग्रह दिलिपराज प्रकाशनने प्रकाशित केला असून प्रसिद्ध चित्रकार संतोष घोंगडे यांनी विषयाला अनुरूप चित्रे व आकर्षक मुखपृष्ठ रेखाटले आहे. किशोर मासिकाचे कार्यकारी संपादक किरण केंद्रे यांनी या पुस्तकाची पाठराखण केली आहे.

# राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या स्वप्नातील आश्रय केंद्र म्हणजेच जिव्हाळा बेघर निवारा केंद्र करण्याचा प्रयत्न करणार - पत्रकार वैभव स्वामी

बीड /प्रतिनिधी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी आपल्या आयुष्यामध्ये जे प्रमुख १० सूत्र अंगीकारले त्यापैकी पाच सूत्र जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये प्रामाणिकपणे निस्वार्थ भावनेने राबवले जातात.भविष्यामध्ये हे केंद्र राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या स्वप्नातील आश्रय केंद्राप्रमाणे उभा करण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे करणार असल्याचे जाहीर प्रतिपादन पत्रकार वैभव स्वामी यांनी पुण्यतिथीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमांमध्ये व्यक्त केले. बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची ६९ व्या स्मृतिदिनी प्रतिमेचे पूजन करून आणि संपूर्ण परिसर स्वच्छ करून साजरा करण्यात आला. यावेळी पत्रकार वैभव स्वामी म्हणाले की, राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये देवापेक्षा माणसाला महत्त्व दिले. आज खऱ्या अर्थाने याचीच गरज निर्माण झाली आहे. त्यांनी जी दहा प्रमुख सूत्रे जीवन जगण्याची दिली








ती जर सर्वांनी पाळली तर सर्वांचा विकास तर होईलच मात्र हा देश सुद्धा एक आदर्श होईल.त्यांनी गाव रस्ते मंदिरे स्वच्छ ठेवणे हीच खरी ईश्वर सेवा आहे असे सांगितले त्याचे अनुपालन आपण सर्वांनी केले पाहिजे. अंधश्रद्धेला विरोध केला पाहिजे. शिक्षणाला महत्व दिले पाहिजे. समता आणि बंधुत्वा पाळली पाहिजे. कष्टाला कमी न लेखता काम करून जगणे हेच खरे श्रेष्ठ जीवन आहे हे अंगीकारले पाहिजे.गरिबांची सेवा करून त्यांना आधार देणे हे जीवनाचे ध्येय त्यांनी मानले. भविष्यात याच तत्त्वावर प्रामाणिकपणे चालून समाजातील वंचित आणि रंजल्या गांजल्यांना आधार देण्याचा प्रमाणिक प्रयत्न करणार आहे. याची सुरुवात या जिव्हाळा बेघर निवारा केंद्रापासून करत असल्याचे पत्रकार वैभव स्वामी यांनी आपल्या अभिवादनातून व्यक्त केले. या कार्यक्रमाला जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य,व्यवस्थापक राजू वंजारे, महिला काळजीवाहक छाया सरोदे यासह जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील सर्व लाभार्थी उपस्थित होते. सर्वांनी मिळून जिव्हाळा बेघर निवारा केंद्राची स्वच्छता करत भविष्यात हे बेघर निवारा केंद्र सर्वांसाठी एक आदर्श जिव्हाळा केंद्र निर्माण करण्याचा संकल्प केला.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात भारतीय संविधानाचा ७५ व्या अमृतमहोत्रावा निमित्त संविधान वाचनी पंधरवडाचे उद्घाटन संपन्न.

केज/ प्रतिनिधी


स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता.केज जि. बीड येथे भारतीय संविधानाच्या ७५ व्या अमृत महोत्सवा निमित्त संविधान वाचन पंधरवडाचे १४ ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत संविधान वाचन पंधरडाचे उद्घाटन स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, धारूरचे मॅनेजर महेश आनंदगावकर, बँकेचे कर्मचारी, यरावंत कुमार अनपर्ती, म निष लाल, चैतन्य र. बनसोडे, अनंत तिवारी, शांतनू गोखले, गौरव म डावी,अद्वैत आनंदगांवकर, दादासाहेब गायकवाड, वैरागे एस. के, रावसाहेब जाधव, नारायण गायकवाड, माजी सरपंच रामराजे गायकवाड, रमेशराव गायकवाड, आरुण गायकवाड, रविंद्र गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, यांच्या उपस्थितीत व ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते, प्राचार्य, डॉ. वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन झाले. या कार्यक्रमाला ग्रंथालयाचे आनंद( भैय्या) गायकवाड, कृष्णराजे गायकवाड, शौर्य गायकवाड, कु. विरा सोनवणे, कु. दिव्या साबळे, कु. कल्याणी घोगले,कु. लक्ष्मी चौरे, सेवानिवृत्त मुरकाध्यापक छाननाना गायकवाड



यांच्यासह विद्यार्थी, युवक, जेष्ठ नागरिक, वाचक, हितचिंतक, ग्रामस्थ यांची मोठया संख्येने उपस्थिती होती. या निमित्ताने भारतीय संविधानाचे वाचन करण्यात आले, ग्रंथवाचनासह ग्रंथप्रदर्शनही घेण्यात आले. १४ ते २९ डिसेंबर २० २५ या कालावधी विविध कार्यक्रम व उपक्रम राबवून हा भारतीय संविधान पंधरवडा राबविला जाणार आहे. या वेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्तविक, सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद( भैय्या) गायकवाड यांनी केले.

# भारत हिंदू राष्ट्रच, संविधानाच्या मान्यतेची गरज नाही, मोहन भागवत

भारत हे एक हिंदू राष्ट्र आहे आणि हे वास्तव स्वीकारण्यासाठी कोणत्याही घटनात्मक मंजुरीची किंवा कागदोपत्री पुराव्याची आवश्यकता नाही", अशा शब्दांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (RSS) सरसंघचालक मोहन भागवत यांनी संघाची भूमिका स्पष्ट केली. कोलकाता येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० व्या वर्षानिमित्त आयोजित १०० व्याख्यानमाला या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी मोहन भागवत यांनी आपल्या भाषणात हिंदू राष्ट्राची संकल्पना,



संविधानातील तरतुदी आणि संघाची कार्यपद्धती यावर सविस्तर भाष्य केले. मोहन भागवत यांनी हिंदू राष्ट्राची तुलना नैसर्गिक सत्याशी केली. ते म्हणाले, "सूर्य पूर्वेकडून उगवतो, हे सत्य आहे. हे कधीपासून सुरू झाले हे आपल्याला माहित नसले, तरी ते मान्य करण्यासाठी आपल्याला कोणत्याही घटनात्मक मंजुरीची गरज भासत नाही. त्याचप्रमाणे हिंदुस्तान हे हिंदू राष्ट्र आहे, हे एक नैसर्गिक सत्य आहे. जोपर्यंत या मातीवर भारतीय संस्कृतीचा आदर करणारा एक व्यक्ती जिवंत आहे, तोपर्यंत हे राष्ट्र हिंदू राष्ट्रच राहील." असे विधान मोहन भागवत यांनी केले. तो प्रत्येकजण हिंदू "भविष्यात संसदेने संविधानात सुधारणा करून हिंदू राष्ट्र हा शब्द जोडला किंवा नाही जोडला, तरी त्याने वास्तवात फरक पडणार नाही. धर्मनिरपेक्ष (Secular) आणि समाजवादी (Socialist) हे शब्द मूळ संविधानाच्या प्रस्तावनेत नव्हते. १९७६ मध्ये आणीबाणीच्या काळात ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी हे शब्द जोडले होते. संघासाठी हे शब्द महत्त्वाचे नसून, या भूमीची मूळ ओळख महत्त्वाची आहे", असेही मोहन भागवत म्हणाले.

## सत्संग फाउंडेशन ( मैत्री) मुंबई श्रीमती अस्मिता पेंढारकर यांनी निसर्ग प्रेमी सुमित राठोड यांच्या रोपवाटीका व बीज बँकेला दिली भेट

दैनिक लोकआरंभ प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे

नागपूर दि.२० डिसेंबर २०२५ ला सत्संग फाउंडेशन मुंबई माय ट्री प्रोजेक्ट च्या श्रीमती अस्मिता पेंढारकर मॅडम मुंबई यांनी सुमित राठोड यांच्या बीज बँक व रोप वाटीकेला भेट दिली आहे यात सुमित राठोड यांनी संकलन केलेल्या १२० पेक्षा जास्त प्रकारच्या सर्व बीयाची पाहणी केली व बिया विषयी माहिती दिली तसेच बियांचे जतन करने ,संरक्षण , संगोपन, संकलन ,त्या पासुन सिडसबॉल तयार करने रोप तयार करने या सर्व विषयी माहिती सुमित राठोड यांनी दिली रोप वाटीकेची सुद्धा पाहणी केली यात साधारण आठशे ते एक हजार वृक्ष होती यात आंबा ,फणस, जांब, जाबुळ ,मोह, करंजी, कडुनिंब, बादाम, शेवगा ,हादगा, बेल, चंदन ,आपटा ,पळस, उंबर, वड ,पिंपळ ,अशोका असे विविध वृक्षांची पाहणी व माहीतीची देवानं घेवान झाली काही प्रश्नांची माहिती त्यांनी विचारली जे राठोड सर



यांनी दिली मा विपोमनि रारापोबल कार्यालय नागपूर परिसर मध्ये लागवड केलेल्या ५१० वृक्षाची पाहणी केली या झाडाची लागवड संगोपन संवर्धन संगोपन विषयी माहिती घेतली तसेच सुमित राठोड यांनी या परीसर मध्ये तयार केलेल्या चर खोदून तयार केल्या पन्नास यांची पण आंकाशा नी पाहणी केली यात साधारण १ ते २ लाख लिटर पाणी जमीनीत मुरत आहे अस्मिता म्हणतात की छंद जोपासावा तर सुमित राठोड सारखे जे जन कल्याण करिता आहे समाजाकरिता आहे पशु पक्षी सह मनुष्याला फायदेशीर आहे सुमित राठोड यांनी आजवर अनेक रोप तयार करुन मोफत दिली आहेत सोबत लाखो बीया सुध्दा दिल्या आहेत हे कार्य खरोखर खूप छान व सुंदर आहे आम्ही खुप खुप शुभेच्छा निसर्ग प्रेमी सुमित राठोड व सौ. पत्नी सपना राठोड तथा त्यांची चिमुकली मुलगी काव्याला पर्यावरण कार्य करिता शुभेच्छा देतो असंच कार्य करत राहा आणि पर्यावरण करिता हातभार लावा

## शिवछत्रपती महाविद्यालयात प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन



प्रतिनिधी/प्रदीप पोटफोडे

शिवछत्रपती महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात 20 डिसेंबर रोजी पब्लिक स्पिकिंग आणि प्रभावी संवाद या विषयावरील १५ दिवसांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना इंग्रजी भाषा प्रभावी संवादाची पध्दत विद्यार्थ्यांसाठी स्पष्ट केली..प्रमुख पाहुणे म्हणून पीएम उषा आयक्युएसी समन्वयक डॉ. संदीप सातोनकर यावेळी उपस्थित होते. प्रमुख वक्ते डॉ. हेमंतकुमार जैन, इंग्रजी विभागप्रमुख, यांनी विद्यार्थ्यांना प्रभावी संवादासाठी लागणाऱ्या विविध कौशल्यांबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषा कौशल्यच्या आत्मविश्वासात वाढ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागातील प्रा. सचिन कदम यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जवाहर मा.व उचच मा.वद्‍यालय पाचोड येथे संत गाडगेबाबा यांना अभविादन



प्रतिनिधी/प्रदीप पोटफोडे

आज दिनांक २० डिसेंबर शनिवार रोजी पाचोड येथील जवाहर मा.व उच्च मा.विद्यालयात संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त मुख्याध्यापक प्रभाकर खंबाट सर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी प्रा. राजकुमार भुमरे सर,सुभाष अवघड,सुरेश बढे,राजाराम धांडे,विजय लिहिणार,प्रभाकर कांबळे,सुरेश गायकवाड,उमेश नारळे,श्रीमती प्रतिभा नारळे,बाबुराव सरकुंडे,अभिजीत रोडे,सुरेश बलपेलवाड,सुरेंद्र सरकटे,शेषराव मोरे मामा,काळे बाबा यांच्यासह विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते...!!

## कर्मयोगी गाडगेबाबांचे विचार घेऊन विद्यार्थ्यांनी कृतीशील व्हावे-डॉ.हनुमंत सौदागर

केज/प्रतिनिधी

संत गाडगेबाबांचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत. विचारातून कृतिशीलता जपावी असे मत डॉ.हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते शहरातील भाऊसाहेब पाटील अध्यापक(बी एड) महाविद्यालयात संत गाडगे महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून बोलत होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.हनुमंत सौदागर, प्रमुख पाहुणे सरस्वती महाविद्यालयातील प्रा.डॉ. हरिदास शिंदे हे विचारपीठावर उपस्थित होते.प्रा.बलाढये यु.बी.,प्रा.कचरे जे. एस.,प्रा.लुंगारे एस.आर.,प्रा. जगदाळे एम.एच.,प्रा.चोले एन. जे.,ग्रंथपाल संतोष साळवी, सुजीत नाईकवाडे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना डॉ.सौदागर म्हणाले संत गाडगेबाबा हे मानवतावादी संत होते



जीवनभरात सेवेचा वसा घेऊन दिवसभर गावातील घाण साफ करून रात्री लोकांच्या डोक्यातील अंधश्रद्धेची घाण साफ करण्याचे कार्य त्यांनी केले.समाजसेवा सर्वश्रेष्ठ असल्याचा विचार त्यांनी दिला. त्यांच्या विचारातून देश घडत आहे.असे मत व्यक्त केले.छात्रअध्यापक परशुराम कचरे,शेख साहील या विद्यार्थ्यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अरविंद गायसमुद्रे,सतीश नेहरकर, यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## येवता येथे पाण्याची मोटर चालू करण्यावरुन पुतण्या चुलत्याची भांडणे, उचलल्या कुर्हाडी;चार जणांविरुद्ध केज पोलिसांत गुन्हा दाखल

केज/प्रतिनिधी

विहिरीवरील पाण्याची मोटर चालू करण्यावरून पुतण्या चुलत्याची भांडणे झाल्याच्या घटनेवरून केज पोलीस ठाण्यात चुलत्यासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील येवता येथील प्रणव अशोक सक्राते वय २२ वर्षे हे दिनांक १७ डिसेंबर रोजी स.नं.१४१ मधील विहिरीवर पाण्याची मोटर चालू करण्यासाठी गेले असता प्रणव यांचे चुलते मल्हारी लक्ष्मण सक्राते, त्यांचा मुलगा दीपक मल्हारी सक्राते, प्रवीण मल्हारी सक्राते व शारदा मल्हारी संक्राते हे सर्वजण विहिरीवर आले व प्रणव सक्राते यांना म्हणाले की, व्हेरी वरची मोटर चालू करू नकोस विहीर व पाण्याची मोटर आमची आहे असे म्हणून शिवीगाळ करण्यास सुरू केली. प्रणव सक्राते यांना चापटा बुक्क्यांनी मारहाण केली त्यांचे चुलते मल्हारी संक्राती यांनी हातातील कत्तीने प्रणवच्या उजव्या हातावर मारले असता प्रणव यास जखम झाली व रक्त निघू लागले तेव्हा इतर सर्वांनी प्रणव यास हातात दगड घेऊन मुक्का मार दिला. यापुढे तू किंवा तुझ्या घरच्यांनी विहिरीपाशी पाऊल ठेवला तर तुम्हाला जीवे मारून टाकू अशी जीवे मारण्याची धमकी दिली. भांडणाचा आवाज ऐकून अशोक देवराव साखरे यांनी येऊन त्यांच्या भांडणाची




सोडवा सोडवा केली. प्रणव चे वडील अशोक लक्ष्मण सक्राते हे घरी आले व त्यांनी प्रणवला गाडीवर बसून केज पोलीस स्टेशन येथे घेऊन आले व केज पोलिसांनी उपचार कामी पत्रक देऊन प्रणव सक्राते यांना केज येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी पाठवले. रुग्णालयात उपचार घेऊन प्रणव सक्राते हे केज पोलीस ठाणे येथे हजर होऊन मल्हारी लक्ष्मण सक्राते, दीपक मल्हारी सक्राते, प्रवीण मल्हारी सक्राते, शारदा मल्हारी सक्राते यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. सदर गुन्ह्याचा पुढील तपास हा पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. हनुमान मुंडे हे करत आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com